# वैदर्भिय संत गाडगे बाबांच्या साहित्याचे ग्रंथसूचीत्मक अध्ययन

**प्रा.डॉ. कविता मुरलीधरराव इंगळे** ग्रंथपाल स्व. पंचफुलबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, वरूड E-mail : kavita61072@gmail.com

---

**सारांश (Obstract) :-**

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणूनओळखली जाते. महाराष्ट्रामध्ये विविध विषयावरील वाचनसाहित्य संग्रह मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु तो अजुनही वाचकांपर्यंत, संशोधकांपर्यंत पोहोचलेला नाही. या वाचनसाहित्यातूनच सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक, वारसांचा परिचय होतो. असे विखुरलेले सर्व वाचन साहित्य एकत्रित करून त्यांचा विषयानुसार संग्रह करून ते साहित्य भावी पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रंथसूची हे एक महत्वाचे साधन आहे. कारण ग्रंथसुचीच्या साहाय्याने जगामध्ये आतापर्यंत निर्माण झालेल्या आणि सध्या निर्माण होत असणाऱ्या ज्ञानाचा शोध घेता येतो. प्रस्तुत शोध निबंधामध्ये देखील वैदर्भिय संत कर्मयोगी गाडगेबाबा यांच्यावर लिहिलेल्या साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :-**

जागतिकीकरणामुळे ज्ञानाधिष्ठित समाजामध्ये ग्रंथ, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्याच्या निर्मितीत प्रचंड वाढ होत आहे. ज्ञानोपासक लोकांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी साहित्याची माहिती होणे आवश्यक आहे. या साहित्याचा परिचय होण्यासाठी त्यांची यादी अथवा सूची यासारखे साधन शोधतांना उपलब्ध होणे आवश्यक ठरते. ग्रंथसूची म्हणजे मानवाच्या लेखननिविष्ठ ज्ञानभंडाराचा दरवाजा खुली करण्याची गुरूकिल्लीच होय.

ग्रंथसूची ही एक संदर्भ सेवा आहे. यामध्ये पूर्वी प्रकाशित झालेल्या व पुढेही प्रकाशित होणाऱ्या लेखन सामुग्रीतील वाचकाला हवे ते नेमके, साहित्य उपलब्ध करून दिल्या जाते. माहितीच्या विस्फोटामुळे माहिती शोध ग्रंथसूची हे एक उत्तम साधन आहे. ग्रंथसूची ही जेवढी व्यापक व सखोल तेवढी ती अधिक उपयोगी ठरते. अभ्यासकाला, संशोधकाला त्याच्या विषयातील ग्रंथांची माहिती शास्त्रीय पद्धतीने पुरविणे हाच ग्रंथसूचीचा मुख्य उद्देश आहे.

पश्चिम विदर्भामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश होतो. या क्षेत्रामध्ये समाजसुधारणा, समाजविकास, समाजोद्धार, मूल्यसंरक्षण व विधायक कार्याच्या दृष्टीकोणातून अनेक संतांनी कार्य केलेले आहे. या संतांपैकी कर्मयोगी संत गाडगे बाबा हे एक होय. गाडगेबाबा हे निरक्षर असूनही त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांच्या कार्यावर देखील इतर लेखकांनी 2019 पर्यंत लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या साहित्याचा ग्रंथसूचीत्मक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

समाजसुधारणेचा ध्यास घेतलेले आणि समाजसेवेचे व्रत स्विकारून त्यासाठी अविरत झटलेले आधुनिक काळातील महान संत थोर समाजसुधारक कर्मयोगी संत गाडगे महाराज यांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी अमरावती जिल्ह्यातील भूतेश्वरी नदीच्या तिरावर असलेले शेणगाव येथे एका सामान्य परीट जातीच्या कुटूंबात झाला.

समाजसुधारणेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गाडगे महाराजांनी गावोगावी भटकंती करून किर्तन केले व या किर्तनाच्या माध्यमातून लोकजागृती करण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिला.

प्रापंचीक जिवनातून विरक्त होवून पारमार्थिक मार्गाकडे वळलेले गाडगे महाराज हे एक संत होते. परंतु ज्या समाजात ते राहत होते त्या समाजाकडे त्यांनी पाठ फिरविली नाही. स्वत:च्या संसारापेक्षा सर्व समाजाच्या संसाराची काळजी घेणारे ते खरेखुरे संत होते. आपल्या समाजात असलेल्या अज्ञान, अंधश्रद्धा, भोळया समजुती, अनिष्ठ रूढी,

प्रथा, परंपरा इत्यादीवर कोरडे ओढून दुर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने समाजसुधारक ठरले होते. बहुजन समाजातील भोळ्या भाबड्या जनतेला शहाणे करून तिला योग्य मार्ग दाखविण्याचा त्यांनी ध्यास घेतला होता.

गाडगे महाराज हे स्वच्छतेचे पुजारी होते. ते किर्तनासाठी ज्या गावी जात तेथील परिसर स्वत: हातात झाडू घेवून प्रथम स्वच्छ करीत असे.

समाजसुधारणेसाठी त्यांनी किर्तन हे माध्यम निवडले. परंतू ते स्वत: निरक्षर असले तरी लोकशिक्षणासाठी समाजसुधारणेसाठी उपयुक्त असलेला अभंग ते पटवून सांगत. विदर्भातील आपल्या गावापासून त्यांनी किर्तनाद्वारे लोकशिक्षणाला प्रारंभ केला. महाराष्ट्रातील प्रत्येक गावात तसेच गुजरात, कर्नाटकातील काही खेड्यात फिरून त्यांनी लोकजागृती केली.

समाजसुधारणेची धगधगती ज्योत समाजाच्या मनात तेवत ठेवण्याचे कार्य त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत केले. म्हणून आधुनिक समाजसुधारक किंवा संत म्हणून गाडगे महाराजांकडे पाहिले जाते.

**संशोधन क्षेत्र :-**

संशोधन क्षेत्र हे संपूर्ण पश्चिम विदर्भ असून त्यातील अमरावती जिल्हा ही गाडगेबाबांची जन्मभूमी व कर्मभूमी या अनुषंगाने येथे अभ्यासली गेली आहे. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांचे स्वत:चे लेखन कार्य नाही. परंतु यांच्यावर ग्रंथ लेखन करणाऱ्यांची संख्या मात्र अधिक आहे. त्यांच्यावर 2019 पर्यंत 73 लेखकांनी ग्रंथलेखन करून ते प्रकाशित केले आहे. कर्मयोगी संत गाडगे बाबांशी संबंधीत साहित्य 15 वाङ्मयीन प्रकारात उपलब्ध आहे. परंतु त्यापैकी चरित्रात्मक व उपदेशात्मक ग्रंथांचे प्रमाण सर्वाधिक आहे. कर्मयोगी संत गाडगेबाबा यांचे समाजप्रबोधन विषयक विचार, कार्य व चरित्र यावर इ.स. 1920 पासून ग्रंथ प्रकाशित झालेले आहे. परंतु यामध्ये बहुतांश 81.20% ग्रंथ इ.स. 1981 नंतरच प्रकाशित झाल्याचे निदर्शनास आले.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक तसेच सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्व :-**

ग्रंथसूची हे संदर्भसेवेच असं एक साधन आहे की, त्याव्दारे अभ्यासकाला किंवा संशोधकाला सद्यस्थितीत आपल्या विषयाशी संबंधीत क्षेत्रामध्ये कोणकोणते साहित्य उपलब्ध आहेत किंवा प्रकाशित झालेले आहे. याची माहिती मिळते.

ज्ञानाच्या विविध क्षेत्रातील विकासासाठी माहिती ही लवकरात लवकर व सुलभपणे प्राप्त होणे आवश्यक आहे. व्यावसायिकांना, अभ्यासकाला तसेच संशोधकाला आवश्यक असलेली माहिती ही अचुक व जलदगतीने उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथसूची ही महत्वपूर्ण भूमिका पार पाडते. लेखकांना तसेच अभ्यासकांना नविण ग्रंथ लेखनासाठी ग्रंथसूचीचा उपयोग होतो.

आज माहिती ही विपूल प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचबरोबर ती विविध स्वरुपामध्ये उपलब्ध होत आहे. किंबहूना ती अस्ताव्यस्त तसेच विस्कळीतही आहे. अशा विस्कळीत माहितीवरून संशोधकाला अभ्यासकाला आवश्यक असलेली नेमकी व योग्य माहिती ही ग्रंथसूचीद्वारे मिळू शकते.

**संशोधनाचा उद्देश :-**

1) संत गाडगे बाबांच्या साहित्याचे एकत्रीकरण करून त्यातील विविध विषयांवर प्रकाश टाकणे.
2) संत गाडगे बाबांच्या साहित्याचा लेखकनिहाय अभ्यास करणे.
3) संत गाडगे बाबांच्या साहित्याचा कालखंडनिहाय अभ्यास करणे.
4) संत गाडगे बाबांच्या साहित्याचा भाषानिहाय अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

1) संत गाडगेबाबांनी केलेल्या कार्यावर अनेक लेखकांनी लेखन केलेले आहे व संशोधकांनी संशोधनही केलेले आहे.

2) संत गाडगेबाबांच्या साहित्याची बरीचशी निर्मिती ही मराठी व हिंदी भाषेत झालेली आहे.

3) संत गाडगेबाबांच्या साहित्यामध्ये सर्वात जास्त ग्रंथ लेखन हे त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात व तत्पश्चात झालेले आहे.

**सारणी क्रमांक 1**

**संत गाडगे बाबा यांच्या जीवन कार्यावरील ग्रंथांची लेखकनिहाय विश्लेषण दर्शक सारणी**

| अ.क्र. | लेखकाचे नांव | एकूण | % |
|---|---|---|---|
| 1 | रा.तु. भगत | 18 | 15.38 |
| 2 | रघुनाथ कडवे | 07 | 5.98 |
| 3 | भ.रा. भागवत | 04 | 3.43 |
| 4 | प.ह. पाटील | 04 | 3.42 |
| 5 | श.सु. धोंगटे | 04 | 3.42 |
| 6 | इरगोंडा पाटील | 03 | 2.56 |
| 7 | राम पाथरकर | 03 | 2.56 |
| 8 | पांडूरंग कवडे | 03 | 2.56 |
| 9 | राम उगांवकर | 03 | 2.56 |
| 10 | लक्ष्मण पापडकर | 02 | 1.71 |
| 11 | नारायणदास राठी | 0२ | 1.71 |
| 12 | सुधाकर सामंत | 02 | 1.71 |
| 13 | विठ्ठल वाघ | 02 | 1.71 |
| 14 | अरूण गोखले | 01 | 0.85 |
| 15 | दत्ता भोसले | 01 | 0.85 |
| 16 | मनिषा ईजा | 01 | 0.85 |
| 17 | जे.ए. मणीयार | 01 | 0.85 |
| 18 | बबन सरारकर | 01 | 0.85 |
| 19 | आप्पासाहेब वाघमारे | 01 | 0.85 |
| 20 | गीरीजा कीर | 01 | 0.85 |
| 21 | के.सी. ठाकरे | 01 | 0.85 |
| 22 | वसंत शिरवाडकर | 01 | 0.85 |
| 23 | अच्युत ग. देशमुख | 01 | 0.85 |
| 24 | वासुदेव महाराज | 01 | 0.85 |
| 25 | मनोज तायडे | 01 | 0.85 |
| 26 | संतोष पावडे | 01 | 0.85 |
| 27 | सुमन बंधू | 01 | 0.85 |
| 28 | सत्यवान मेश्राम | 01 | 0.85 |
| 29 | गो. नि. दांडेकर | 01 | 0.85 |

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | ओंकार जोशी | 01 | 0.85 |
| 31 | श्रीकृष्ण काळे | 01 | 0.85 |
| 32 | किशोर दिघेकर | 01 | 0.85 |
| 33 | नाना ढाकुलकर | 01 | 0.85 |
| 34 | य. सी. बानुबाकुडे | 01 | 0.85 |
| 35 | सुभाष कांबळे | 01 | 0.85 |
| 36 | भिकाजी जा. भोसले | 01 | 0.85 |
| 37 | बालाजी शिंदे | 01 | 0.85 |
| 38 | सुधाकर प्रभू | 01 | 0.85 |
| 39 | जी. टी. मैदमवार | 01 | 0.85 |
| 40 | जे. बी. पाटील | 01 | 0.85 |
| 41 | प्र. वा. जावरकर | 01 | 0.85 |
| 42 | विमत किर्ती | 01 | 0.85 |
| 43 | वसंत पोतदार | 01 | 0.85 |
| 44 | उषा वेरूळकर | 01 | 0.85 |
| 45 | दया पांडे | 01 | 0.85 |
| 46 | गोपाल नि. दांडेकर | 01 | 0.85 |
| 47 | उ. बा. कविटकर | 01 | 0.85 |
| 48 | शरद कोपर्डीकर | 01 | 0.85 |
| 49 | गोकुलभाई भट | 01 | 0.85 |
| 50 | गुणवंत चऱ्हाटे | 01 | 0.85 |
| 51 | शि. स. तिनईकर | 01 | 0.85 |
| 52 | नरेशचंद्र काढोळे | 01 | 0.85 |
| 53 | ह. रा. टिवरे | 01 | 0.85 |
| 54 | सुमश नाशीककर | 01 | 0.85 |
| 55 | ना. ग. उमाळे | 01 | 0.85 |
| 56 | शोभना लोंढे | 01 | 0.85 |
| 57 | मधुकर केचे | 01 | 0.85 |
| 58 | बाबा मोहोड | 01 | 0.85 |
| 59 | जुगलकिशोर राठी | 01 | 0.85 |
| 60 | अरूण गडकरी | 01 | 0.85 |
| 61 | सुधाकर मेंडे | 01 | 0.85 |
| 62 | आप्पासाहेब वाघमारे | 01 | 0.85 |
| 63 | चि.धा. बालक | 01 | 0.85 |
| 64 | ग. श. देवळे | 01 | 0.85 |
| 65 | आबासाहेब जाधव | 01 | 0.85 |
| 66 | प्राची गोंधळेकर | 01 | 0.85 |

| | | | |
|---|---|---|---|
| 67 | सत्याम मेश्राम | 01 | 0.85 |
| 68 | सुदाम सावरकर | 01 | 0.85 |
| 69 | वासुदेव अडगावकर | 01 | 0.85 |
| 70 | प्रबोधनकार ठाकरे | 01 | 0.85 |
| 71 | बाबुराव घोडके | 01 | 0.85 |
| 72 | खुशाल अच्युत डवरे | 01 | 0.85 |
| 73 | रिचा कश्यप | 01 | 0.85 |
| | एकूण | 117 | 100 |

वरील सारणी क्र. 1 मध्ये श्री संत गाडगे बाबांवर लिहल्या गेलेल्या ग्रंथांची लेखक निहाय माहिती दिलेली आहे. सारणीत दिलेल्या माहितीचे विश्लेषण केल्यावर असे आढळून येते की, एकूण 73 लेखकांनी त्यांच्या जिवनकार्यावर लेखन केलेले असून त्यामध्ये सर्वाधिक 18 (15.38%) ग्रंथ श्री रा.तु. भगत यांनी प्रकाशीत कलेली असल्याचे निदर्शनास येते. त्यानंतर रघुनाथजी कडवे 07 (5.98%) तर भा.रा. भागवत, श.सु. घोंगटे, प. ह. पाटील यांनी प्रत्येकी 04 (3.42%) ग्रंथाचे यांनी गाडगे बाबांवर लेखन केलेले आहे. इतर 68 लेखकांनीही त्यांच्या जीवनावर दोन किंवा एक पुस्तके प्रकाशीत केल्याचे आढळून येते.

**सारणी क्रमांक 2**

**संत गाडगे बाबांवरील ग्रंथांची कालखंडानुसार विश्लेषण दर्शक सारणी**

| अ.क्र. | कालखंड (इ.स.) | एकुण ग्रंथाची संख्या | एकुण ग्रंथ संख्येशी प्रमाण % | संचयी प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 | 1920-1940 | 02 | 1.71 | 1.71 |
| 2 | 1941-1960 | 09 | 7.69 | 9.4 |
| 3 | 1961-1980 | 08 | 6.84 | 16.24 |
| 4 | 1981-2000 | 47 | 40.17 | 56.41 |
| 5 | 2000 च्या पुढील | 48 | 41.03 | 97.44 |
| 6 | प्रकाशन वर्ष उपलब्ध नसलेले | 03 | 2.56 | 100.00 |
| | एकूण | 117 | 100.00 | 100.00 |

वरील सारणी क्र. 2 मध्ये कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या जिवनकार्यावर लिहील्या गेलेल्या ग्रंथाचे कालखंड निहाय विश्लेषण करण्यात आले आहे. महाराजांच्या कार्यावर एकूण 117 ग्रंथांची निर्मिती झाल्याचे आढळून आले. या ग्रंथापैकी 11 (9.4%) ग्रंथ इ.स. 1920 ते इ.स. 1960 या कालखंडामध्ये प्रकाशीत झाले असून इ.स. 1961 ते इ.स. 1980 या कालखंडात 8 (6.84%) ग्रंथाची तर इ.स. 1981 ते इ.स. 2000 या कालखंडात 47 (40.17%) ग्रंथाची निर्मिती झालेली असल्याचे निदर्शनास येते.

त्यांच्यावरील 48 (41.03%) ग्रंथ इ.स. 2000 पुढील कालखंडातील असल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत श्री संत गाडगे बाबांवर इ.स. 1980 नंतर 95 (81.20%) ग्रंथ लिहिल्या गेले असल्याचे निदर्शनास येते. अर्थात कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांचा जिवनकाळ लक्षात घेता त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात व तत्पश्चात त्यांच्या जीवनकार्यावर मोठ्या प्रमाणावर ग्रंथ निर्मिती होवून ते ग्रंथ प्रकाशीत झाल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्रमांक 3**

**संत गाडगेबाबांवरील ग्रंथांची भाषानिहाय विश्लेषण दर्शक सारणी**

| अ.क्र. | भाषा | ग्रंथाची संख्या | एकुण ग्रंथ संख्येशी प्रमाण % | संचयी प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | 103 | 88.03 | 88.03 |
| 2 | हिंदी | 07 | 5.98 | 94.01 |
| 3 | इंग्रजी | 06 | 5.13 | 99.14 |
| 4 | गुजराथी | 01 | 0.81 | 100.00 |
| | एकूण | 117 | 100.00 | 100.00 |

वरील सारणी क्र. 3 मध्ये श्री संत गाडगे बाबावर लिखीत पुस्तकांचे भाषानिहाय विवरण दिलेले आहे. वरील सारणीत दिलेल्या माहितीच्या आधारे असे आढळून येते की, श्री संत गाडगे बाबा महाराजांवर सर्वाधिक 103 (88.03%) ग्रंथ मराठीत लिहील्या गेले आहेत. तर अनुक्रमे 07 व 06 ग्रंथ हिन्दी व इंग्रजी भाषेत लिहील्या गेले आहे.

1थोडक्यात कर्मयोगी गाडगे महाराजांचे समाजप्रबोधनाचे कार्य महाराष्ट्रात असल्याने बहुतांश ग्रंथ महाराष्ट्रातील लेखकांनी लिहीले असल्याने ते मराठीत आहेत. त्याचप्रमाणे हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये ग्रंथ लिखान होवून त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमेपलीकडेही होत आहे.

**निष्कर्ष :-**

संत गाडगे बाबा स्वत: निरक्षर असल्यामुळे त्यांच्यावर इतर लेखकांनी मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्मिती केलेली आहे. सन 2019 पर्यंत 73 लेखकांनी ग्रंथलेखन करून ते प्रकाशित केले असून श्री संत गाडगे बाबांचे साहित्य हे मराठी व हिंदीतून प्रकाशित झाल्याचे दिसून येते. कर्मयोगी गाडगे बाबांचे समाजप्रबोधनाचे कार्य महाराष्ट्रात असल्याने बहुतांश ग्रंथ महाराष्ट्रातील लेखकांनी लिहीले असल्याने ते मराठीत आहेत. त्याचप्रमाणे हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये ग्रंथ लिखान होवून त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार महाराष्ट्राच्या भौगोलिक, सिमेपलीकडेही होत आहे. इ.स. 1920 पासून ग्रंथ प्रकाशीत झालेले आहे. परंतु यामध्ये बहुतांश 81.20% ग्रंथ इ.स. 1981 नंतरच प्रकाशित झाल्याचे निदर्शनास येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) काळे, यादव माधव (1924), वऱ्हाडचा इतिहास, बुलढाणा : यादव काळे.

2) कडवे, रघुनाथ (1985), वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, नागपूर : अमोल प्रकाशन.

3) साखरे, राजेंद्र रमाकांत (2003), ग्रंथालय संदर्भ सेवा, तात्वीक व प्रात्यक्षिक, पुणे : युनिर्व्हसल प्रकाशन.

4) पाटील, व्ही.बी. (2012), महाराष्ट्राचा सर्वांगीण इतहास, पुणे - के. सागर.